महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ, शिवाजीनगर, पुणे 411 005.

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY &HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD , PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN 25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY 25536781/82/83 /

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

सुधारित / परीक्षा प्राधान्य

क्रमांक : पुविमं / माध्यमिक पी.1 / उ.माध्य. पी.2 / 5529
दिनांक :– 19 / 06 / 2025.

प्रति,
मुख्याध्यापक / प्राचार्य,
सर्व मान्यता प्राप्त शाळा / कनिष्ठ महाविद्यालये,
जिल्हा :– पुणे, अहिल्यानगर व सोलापूर.

**विषय : माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षा जून–जुलै, 2025 च्या पुरवणी परीक्षेचे तोंडी, प्रात्यक्षिक, श्रेणी व अंतर्गत मुल्यमापन वेळापत्रक व साहित्य जमा करण्याबाबत..**

**संदर्भः 1. क्रमांक–रा.मं / परीक्षा–2 / 2022, दिनांक–06 / 06 / 2025 चे पत्र**
**2. क्रमांक–रा.मं / परीक्षा–2 / 2131, दिनांक–13 / 06 / 2025 चे पत्र.**

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, संदर्भीय पत्रान्वये माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षा जून–जुलै, 2025 च्या पुरवणी परीक्षेची तोंडी, प्रात्यक्षिक, श्रेणी व अंतर्गत मुल्यामापन परीक्षा खालीलप्रमाणे नमूद केलेल्या कालावधीत आयोजित करण्यात येत आहे.

- **उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.12वी)**

| अ.क. | प्रात्यक्षिक परीक्षेचा तपशील | प्रात्यक्षिक परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| 1. | उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ.१२ वी)<br>प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापन परीक्षा | **दि. 24 जून, 2025 ते<br>दि. 04 जुलै, 2025** |
| 2. | NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा. | |

- **माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.10वी)**

| अ.क. | प्रात्यक्षिक परीक्षेचा तपशील | प्रात्यक्षिक परीक्षा कालावधी |
|---|---|---|
| 1. | माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (इ.१० वी )<br>प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापन परीक्षा | **दि. 24 जून, 2025 ते<br>दि. 04 जुलै, 2025** |
| 2. | NSQF अंतर्गत व्यावसायिक अभ्यासक्रम विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा, | |
| 3 | शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा | **दि. 24 जून, 2025 ते<br>दि. 04 जुलै, 2025** |
| 4 | दिव्यांग विद्यार्थ्यांची कार्यशिक्षण विषयाची लेखी व प्रात्यक्षिक परीक्षा | |

**माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षा जून–जुलै, 2025 च्या प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापन परीक्षेसाठी खालील सुचनांप्रमाणे कार्यवाही करावी.**

1. इ. 10 वी व इ. 12वी जून–जुलै, 2025 परीक्षेसाठी प्रचलित पध्दतीनुसार परीक्षा केंद्रावर घेतली जात होती तथापि त्यामध्ये बदल करण्यात येवून ती प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापन परीक्षा संबंधित शाळा व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये घेण्यात यावी. याबाबत राज्यममंडळाचे पत्र क.रा.मं. / परीक्षा–2 / 5508 दिनांक 26 डिसेंबर, 2023 नुसार सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना कळविण्यात आले आहे.

2. प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापनाचे गुण ओ.एम.आर. सीट ऐवजी पोर्टलद्वारे Online पध्दतीने भरावयाचे आहेत. याकरीता www.mahahsscboard.in या वेबसाईटवरुन फेब्रु–मार्च, 2025 परीक्षेप्रमाणेच शाळा / कनिष्ठ महाविद्यालयाच्या Chekar/Maker यांच्या लॉगइनचा वापर करुन संबंधित विद्यार्थ्यांचे गुण भरावयाचे आहेत.
3. या परीक्षेचे गुण Online भरण्यासाठी वेबसाईट **दि.24 जून, 2025 ते दि.04 जुलै, 2025 पर्यंत** सुरु राहील
4. **परीक्षेचा कालावधी मर्यादित असल्याने या परीक्षेसाठी प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापन परीक्षा Out Of Turn पध्दतीने आयोजित करण्यात येणार नाही.** तरी विद्यार्थी संख्येनुसार शाळा व कनिष्ठ महाविद्यायात निर्धारित कालावधीत प्रात्यक्षिक, श्रेणी, तोंडी व अंतर्गत मुल्यमापन परीक्षा घेण्याबाबत तसेच संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची संपुर्ण माहिती प्रत्यक्ष परीक्षेपूर्वी देण्यात यावी याची दक्षता सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना घ्यावी. या परीक्षेपासून कोणताही विद्यार्थी वंचित राहणार नाही. याची दक्षता घ्यावी.
5. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी अंतर्गत व बहिस्थ परीक्ष म्हणून आपल्या शाळा व कनिष्ठ महाविद्यालयातील विषय शिक्षकांची नियुक्ती करण्यात यावी.
6. इ. 12 वी माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान विषयाची परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेण्यात यावी. सर्व विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा कनिष्ठ महाविद्यालयातील संगणकाची मर्यादित संख्या लक्षात घेता एकाचवेळी घेणे शक्य नसल्याने ती गटा गटामध्ये घेण्यात यावी. यासाठी वेळापत्रकात प्रत्येकी दोन सत्र देण्यात आले आहे.
7. सर्व महाविद्यालयांनी संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षेचा दिनांक व वेळ याबाबतची संपुर्ण माहिती प्रत्यक्ष परीक्षेपुर्वीच विद्यार्थ्यांना अवगत होईल, याबाबतची दक्षता घ्यावी.

**माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.10वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.12वी) परीक्षा जून–जुलै, 2025 च्या प्रात्यक्षिक परीक्षेची सहित्य वाटपाची दिनांक, ठिकाण व साहित्य संकलनाची दिनांक व ठिकाण खालीलप्रमाणे आहे. याच दिवशी स्विकारले जाईल. याची कटाक्षाने नोंद घेवून कार्यवाही करावी.**

| अ क | जिल्हा | (अ) साहित्य वाटप | | (ब) साहित्य संकलन | |
|---|---|---|---|---|---|
| | | दिनांक | ठिकाण | दिनांक | वेळ व ठिकाण |
| 1 | पुणे | 16 जून 2025 ते 20 जून 2025 | सोबतच्या यादीनुसार संबंधित लेखी परीक्षेचे केंद्र | इ.10 वी व इ. 12 वी मंगळवार 08 जुलै 2025 | पुणे विभागीय मंडळ कार्यालय सकाळी 11:00 ते 05:00 वाजेपर्यंत |
| 2 | अहिल्यानगर | | | | |
| 3 | सोलापूर | | | | |

- **इ. 12 वी स्वतंत्र गुणतक्ते व उत्तरपत्रिका जमा करण्याबाबतच्या सुचना :**
  1. सर्व भाषा विषय व ग्रेड विषयांचे ऑनलाईन गुणतक्ते गुलाबी पाकिटात भरावे.
  2. अन्य सर्व विषयांचे ऑनलाईन गुणतक्ते निळया पाकिटात भरावे.
  3. प्रात्यक्षिक विषयांच्या सर्व उत्तपत्रिका स्वतंत्र धाग्याने बांधून एकाच खाकी पाकिटात भरावे.
  4. ऑनलाईन गुणतक्ते हे उत्तरपत्रिकांच्या पाकिटात भरावयाचे नाहीत.
  5. हजेरी व गैरहजेरी अहवाल विषय निहाय गुलाबी व निळया पाकिटात भरावे.
  6. सर्व पाकिटांवर कनिष्ठ महाविद्यालयांचा सांकेतीक कमांक व त्यावर संबंधित विषयांचा उल्लेख करावे.
- **इ.10 वी स्वतंत्र गुणतक्ते व उत्तरपत्रिका जमा करण्याबाबतच्या सुचना :**
  1. सर्व विषय, ग्रेड विषयाचे ऑनलाईन गुणतक्ते व हजेरी, गैरहजेरी अहवाल खाकी पाकिटात भरावे.
  2. प्रात्यक्षिक विषयांच्या उत्तपत्रिका एकाच खाकी पाकिटात भरावे.
  3. ऑनलाईन गुणतक्ते हे उत्तरपत्रिकांच्या पाकिटात भरावयाचे नाहीत.
  4. सर्व पाकिटांवर शाळा सांकेतीक कमांक व त्यावर संबंधित विषयांचा उल्लेख करावे.

सदर परीक्षेचे साहित्य विभागीय मंडळ कार्यालयात समक्ष जमा करावयाचे आहे, अन्य कोणत्याही प्रकारे स्विकारले जाणार नाहीत.

19.06.25

(डॉ. माधुरी सावरकर)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे.